## भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २१४ /२०२४ दि. २३/१०/२०२४

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** भिवंडी निजामपुरा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने विविध राजकीय पक्षांचे नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया दि. २२/१०/२०२४ ते दि.२९/१०/२०२४ रोजीपावेतो पार पडणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण नाक्याकडुन आंजुरफाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धामणकरनाका उड्डाणपुलाचे खालुन 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने धामणकर नाका उड्डाणपुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) आंजुरफाटयाकडुन कल्याण नाकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सोमानगर मस्जिदजवळ उड्डाणपुलाचे खालुन 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने धामणकरनाका उड्डाणपुलावरुन कल्याण नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) धामणकर नाक्याकडुन जुना ठाणे रोडने मंडई छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धामणकर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने धामणकरनाका – कल्याण नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडुन बोबडे चौक – धामणकर नाकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौका येथुन वंजारपट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) धामणकरनाक्याकडे जाणाऱ्या के.डी.एम.टी., टि.एम.टि. बसेस यांना **कल्याण नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने के.डी.एम.टी., टि.एम.टि. बसेस यांना **कल्याण नाका** येथे प्रवासी उतरवतील व तेथुनच प्रवासी भरुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) वराळदेवी सर्कलकडुन कामतघर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खडी मशिन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खडीमशिन येथुन वराळदेवी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) कामतघर कडुन वराळदेवी सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मनोज काटेकर यांचे घराजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मानसरोवर तलावास वळसा घेवुन भाग्य नगर – मानसरोवर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २४/१०/२०२४ ते दि. २९/१०/२०२४ रोजीपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.

मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—२/वि.शा. ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, भिवंडी

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी

नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत :—** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :—** समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :—** संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner